# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:03.12.2024** **वार:मंगळवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय दिव्यांग सक्षमीकरण पुरस्कारांचं वितरण
2. महाराष्ट्र भाजपा विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांची केंद्रीय निरीक्षकपदी नियुक्ती; उद्या होणार विधिमंडळ पक्षाची बैठक
3. देशातील थेट परदेशी गुंतवणुकीत यावर्षी एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत चांगली वाढ
4. कनिष्ठ आशिया करंडक हॉकी स्पर्धेत भारत उपांत्यफेरीत; आज मलेशियाशी सामना आणि
5. फेंजल चक्रीवादळामुळे पुद्दुचेरी आणि तामिळनाडूमध्ये मोठं नुकसान; तिरूवन्नामलाईमध्ये भूस्खलनात सात जणांचा मृत्यू; बचावकार्य सुरू

**<u>राष्ट्रपती पुरस्कार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना यावर्षीचे राष्ट्रीय पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे. यानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात एकंदर 33 व्यक्ती आणि संस्थांना हे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. दिव्यांग व्यक्तींचं जीवन अधिक समृद्ध व्हावं या उद्देशाने आखण्यात आलेल्या 16 परिवर्तनात्मक उपक्रमांचाही या कार्यक्रमात सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात येणार आहे. यामध्ये ब्रेल लिपीतील पुस्तकांच्या पोर्टलसह अनेक महत्त्वाच्या उपक्रमांचा समावेश आहे. समाजात बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने सरकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ आणि इतर अनेक भागधारकांना एकत्र आणून समावेशक समाजाची उभारणी करण्याचा दृष्टीकोन बळकट करणे हा या कार्यक्रमाच्या आयोजनामागचा मुख्य हेतू आहे. दरम्यान राष्ट्रपती आजपासून पांच दिवसांच्या ओडिशाच्या दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत.

**<u>उपराष्ट्रपती-मुंबई दौरा</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड एक दिवसाच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. मुंबईतील केंद्रीय कापूस तंत्रज्ञान आणि संशोधन संस्थेच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त उभारण्यात येणाऱ्या शताब्दी स्तंभाच्या उद्घाटन सोहोळ्याला धनखड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<u>पीएम-चंडीगड</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज चंडीगड दौऱ्यावर असून तीन नव्या फौजदारी कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतील प्रगतीबद्दल ते माहिती देणार आहेत. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम या तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या देशभरातील अंमलबजावणीला यावर्षी 1 जुलैपासून सुरूवात करण्यात आली. देशाची न्याय प्रणाली अधिक पारदर्शी, कार्यक्षम आणि सद्यस्थितीतील समाजाच्या गरजांशी सुसंगत असावी या उद्देशानं हे नवे फौजदारी कायदे लागू करण्यात आले आहेत. सुरक्षित समाज, विकसित

भारत:शिक्षेकडून न्यायाकडे असा आज होत असलेल्या कार्यक्रमाचा मुख्य विषय असून या कार्यक्रमात या कायद्यांचा व्यवहारात कसा वापर करता येईल याचं प्रात्यक्षिक दाखवून देण्यात येणार आहे.

**बिर्ला-संसद गोंधळ**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सतत होत असलेला गदारोळ आणि त्यामुळे ठप्प होत असलेलं कामकाज यामुळे निर्माण झालेला तिढा सोडवून कामकाज सुरळीतपणे व्हावं यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल संसद भवनात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली. सदस्यांनी सभागृहाचं कामकाज सुरळीतपणे होऊ द्यावं अशी विनंती बिर्ला यांनी या बैठकीत केली. त्यावर उपस्थित नेत्यांनी कामकाज सुरळितपणे होऊ देण्यास आमचा पाठिंबा राहील असं आश्वासन दिलं. या बैठकीला काँग्रेसचे गौरव गोगोई, टीएमसीचे कल्याण बॅनर्जी, टीडीपीचे लवू श्री कृष्ण देवरायालू, डीएमकेचे टी आर बालू, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव, शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत आणि अन्य नेते उपस्थित होते.

दरम्यान, या महिन्याच्या 13 आणि 14 तारखेला लोकसभेत, तर, 16 आणि 17 तारखेला राज्यसभेत, संविधानाच्या मुद्द्यावर विशेष चर्चा होईल, असं, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी काल पत्रकारांशी बोलताना सांगितलं. दरम्यान अदानी समूहावरील लाचखोरीचे आरोप आणि उत्तर प्रदेशातील संभल इथे झालेला हिंसाचार यांसह विविध मुद्यांवर विरोधकांनी कालही गदारोळ केला. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**भाजप-निरीक्षक**

महाराष्ट्रात सत्ता स्थापनेच्या हालचालींना पुन्हा वेग आला असून विविध पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठी आणि चर्चा सुरू आहेत. राज्यात भाजप विधिमंडळ गटनेता निवडीसाठी पक्षानं गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. हे केंद्रीय निरीक्षक आज राज्यात येणार आहेत; भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक उद्या 4 डिसेंबरला होणार असून त्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठीच्या नावाची औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मुंबईतील आझाद मैदानावर शपथविधी सोहळ्याची जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे.

**एफडीआय**

यावर्षी एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत देशातील थेट परदेशी गुंतवणुकीत अर्थात एफडीआयमध्ये जोरदार वाढ झाली असून ती गेल्या वर्षीच्या तुलनेत 45 टक्क्यांनी वाढून 29 बिलियन डॉलर्सच्या वर गेली आहे. यावर्षी आलेल्या एफडीआयचा प्रामुख्यानं सेवा, संगणक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर, दूरसंचार, वाहन, औषधनिर्मिती आणि रसायनं या अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या क्षेत्रांना लाभ झाला असल्याचं उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाकडून सांगण्यात आलं. एफडीआय मध्ये आलेल्या ओघाचा परिणाम गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ आणि रोजगार निर्मितीच्या रुपानं दिसून येणार आहे. वर्तमान आर्थिक वर्षाच्या जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीतही एफडीआयमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत 43 टक्क्यांनी वाढ झाली असून ती 13 बिलियन डॉलर्सच्या वर गेली आहे.

**फ्रान्स अविश्वास**

फ्रान्सचे पंतप्रधान मायकेल बार्निए यांच्या अल्पमतातील सरकारवर अविश्वास ठरावाला सामोरं जाण्याची वेळ आली आहे. पंतप्रधान बार्निए यांनी संसद सदस्याचं मत विचारात न घेता आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून सामाजिक सुरक्षा वित्त विधेयक पुढे रेटल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव आणण्यात आला आहे. आपण

या ठरावावर पंतप्रधानांच्या विरोधात मतदान करणार असल्याचं उजव्या तसंच डाव्या पक्षाच्याही खासदारांनी म्हटलं आहे

**खो खो**

43व्या कनिष्ठ गट राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांच्या आणि मुलींच्याही संघानं सुवर्णपदके जिंकत आपलं वर्चस्व अबाधित राखलं आहे. मुलांच्या संघानं या स्पर्धेच्या इतिहासातील 35 वा विजय नोंदवत त्यांचा सलग 19 वा विजय साजरा केला, तर मुलींच्या संघानं सलग दहावं आणि एकूण 26 वं विजेतेपद पटकावलं. मुंबईच्या महाराणी अहिल्याबाई होळकर क्रीडा स्टेडियमवर या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत जितेंद्र वसावे आणि सुहानी धोत्रे यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल वीर अभिमन्यू आणि जानकी पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

**हॉकी**

पुरुषांच्या कनिष्ठ आशिया चषक स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत आज भारतीय संघाची मलेशिया बरोबर लढत होणार आहे. ओमानमध्ये मस्कत इथं भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता हा सामना सुरू होईल. या आधी रविवारी झालेल्या सामन्यानं भारतानं दक्षिण कोरियाचा 8 विरुद्ध 1 गोलाने पराभूत करून अ गटात अव्वल स्थान मिळवलं होतं. उपान्त्य फेरीतला आणखी एक सामना पाकिस्तान आणि जपानच्या संघांदरम्यान होणार आहे. स्पर्धेचा अंतिम सामना उद्या होईल.

**फेंजल**

फेंजल चक्रीवादळामुळं पुद्दुचेरी आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये अतिवृष्टी आणि पूर आला असून, जनजीवन विस्कळीत झालं आहे. यामुळे होत असलेल्या अतिवृष्टीमुळे तामिळनाडूतील तिरुवन्नामलाई इथं झालेल्या भूस्खलनात सात जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त नुकतंच हाती आलं असून अधिक तपशीलाची प्रतीक्षा आहे. पुरामुळं पुद्दुचेरीमध्ये चौघांचा मृत्यू झाला आहे, तर तामिळनाडूमध्ये पावसामुळं मरण पावलेल्यांची संख्या आता 20 झाली आहे.

पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री एन.रंगासामी यांनी मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे, तर प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला पाच हजार रुपयांची मदत जाहीर केली. मदत आणि बचावकार्य सुरू असून, पुरात अडकलेल्या 551 लोकांना सुखरुप बाहेर काढून त्यांना मदत शिबिरांमध्ये हलवण्यात आलं आहे. पुद्दुचेरी, कराईकल आणि यानाममध्ये दहा हजार हेक्टरवरील पिकं नष्ट झाली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून सरकारनं हेक्टरी 30 हजार रुपये मदत जाहीर केली आहे. पशुधन आणि मालमत्तेच्या नुकसानाचीही भरपाई दिली जाईल, असंही सरकारनं म्हटलं आहे. राज्यसरकारनं 100 कोटी रुपयांच्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल केंद्र सरकारला पाठवला असून, आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

फेंजल चक्रीवादळ अरबी समुद्राकडं सरकत असून, तामिळनाडूत अनेक जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार पाऊस पडत आहे. तिरुवन्नमलाई आणि विल्लुपुरममध्ये पावसाचा जोर कायम असल्यानं तिथ पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केंद्रसरकारकडं दोन हजार कोटी रुपयांच्या मदतीची मागणी केली आहे. राज्यातील नुकसानाची पाहणी करण्यासाठी केंद्रसरकारनं एक तुकडी पाठवावी अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.